पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/११/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **१५/११/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.सोनवणे शारदा हिरेन
४. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
५. मा.काळे उषा दिलीप

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.जोत्स्ना शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), श्री.मुंढे – प्र.शिक्षणाधाकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) मनपा प्राथमिक शाळांमध्ये साऊंड सिस्टम खरेदी करणेबाबत– मा.शारदा सोनवणे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०१/११/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०९**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – ४१ विषय क्रमांक – ०१
दिनांक - १५/११/२०१८
सुचक : मा.शारदा सोनवणे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर
संदर्भ :- मा.शारदा सोनवणे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

मनपाच्या प्राथमिक शाळांमध्ये गीतमंच कार्यक्रम सादर करण्यासाठी सर्व शाळांमध्ये स्पिकर सिस्टीम उपलब्ध आहे. परंतु सर्व शाळांसाठी गीतमंच कार्यक्रम सादर करण्यासाठी शिक्षण विभागासाठी एक साऊंड सिस्टीम खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७३१/२०१८
दिनांक : १५/११/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.